मार्च अखेरपर्यंत योजनापूर्ती गरजेची

जलजीवन आढावा बैठकीत सूचना; बैठकीला अनेक अधिकारी उपस्थित

लोकसत्ता प्रतिनिधी

नाशिक : जल जीवन मिशन अंतर्गत प्रगतीपथावरील पाणीपुरवठा योजनांची कामे ३१ मार्चपर्यंत पूर्ण करण्याच्या सूचना जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी आशिमा मित्तल यांनी दिल्या आहेत. योजना पूर्ण करण्यासाठी कामाच गती वाढवून लवकरात लवकर उद्दिष्ट पूर्ण करण्यासाठी संबंधित अधिकाऱ्यांना निर्देश देण्यात आले.

मुख्य कार्यकारी अधिकारी मित्तल यांनी ग्रामीण पाणी पुरवठा विभागामार्फत राबविण्यात येत असलेल्या जलजीवन योजनेचा दूरदृष्य प्रणालीद्वारे आढावा घेतला. बैठकीत जल जीवन अंतर्गत पाणी पुरवठा योजनांच्या कामांची सद्यस्थिती तपासण्यात आली.

विशेषतः मुख्यमंत्री यांच्या १०० दिवस उपक्रमांतर्गत जिल्ह्यातील पाणीपुरवठा योजनांतील भौतिक प्रगतीचा आढावा घेण्यात आला. या योजनेअंतर्गत ग्रामीण भागातील प्रत्येक घरापर्यंत सुरक्षित आणि स्वच्छ पाणी पोहोचवण्याचा शासनाचा उद्देश आहे. सुधारित योजनांची पूर्तता तसेच नळ जोडणी देण्याच्या प्रक्रियेत येणाऱ्या अडचणींचा देखील यावेळी आढावा घेण्यात आला. काही ठिकाणी रखडलेल्या योजनांबाबत गटविकास अधिकाऱ्यांनी तातडीने कार्यवाही करून त्या पूर्ण करण्याच्या सूचना मित्तल यांनी दिल्या.

जल जीवन योजनेंतर्गत ज्या गावांमध्ये अद्याप नळ जोडणीची कामे अपूर्ण आहेत, त्या गावांमधील लाभार्थींना लवकरात लवकर सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी जिल्हा प्रशासनाने अधिक तत्परतेने काम करावे तसेच गटविकास अधिकारी आणि संबंधित ग्रामपंचायतींचे ग्रामपंचायत अधिकारी यांच्याशी समन्वय साधून नळ जोडणीची कामे तात्काळ पूर्ण करण्याबाबत सूचित करण्यात आले.

योजनांची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी स्थानिक प्रशासनाने गावपातळीवर जास्त लक्ष केंद्रित करावे आणि आवश्यक त्या उपाययोजना त्वरित कराव्यात, असेही त्यांनी स्पष्ट केले. यावेळी ग्रामीण पाणीपुरवठा विभागाचे कार्यकारी अभियंता गंगाधर निवडंगे, उपकार्यकारी अभियंता अजित सूर्यवंशी तसेच सर्व तालुक्यांचे उपअभियंता उपस्थित होते.

हर घर जल
जल जीवन मिशन

अधिकाऱ्यांना निर्देश

नाशिक जिल्ह्यात जलजीवन मिशन अंतर्गत काही ठिकाणी पाणीपुरवठा योजना रखडल्या आहेत. त्यामुळे या योजना मार्च अखेरपर्यंत पूर्ण करण्यासाठी जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी आशिमा मित्तल यांनी अधिकाऱ्यांना निर्देश दिले. योजनांचे काम त्वरेने होण्यासाठी उपाययोजना करण्यास त्यांनी सांगितले.

'स्वच्छतेचा हरित कुंभ' स्पर्धेत १२ हजार नाशिककर

लोकसत्ता प्रतिनिधी

नाशिक : स्वच्छ भारत अभियान अंतर्गत स्वच्छ सर्वेक्षण २०२४-२५ अनुषंगाने 'नाशिक स्वच्छतेचा हरित कुंभ' या उपक्रमाला सुरुवात करण्यात आली आहे. या उपक्रमात स्वच्छता व पर्यावरण संवर्धनबाबत विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले असून आतापर्यंत १२,७०० नागरिकांनी स्पर्धांसाठी अर्ज दाखल केले आहेत. १८ मार्च ही स्पर्धांमध्ये सहभागाची अंतिम तारीख आहे.

सदर स्पर्धांमध्ये शहरातील २५०० नागरिकांना एकूण ६० लाखांची बक्षीसे देण्यात येणार आहेत. या स्पर्धांमध्ये जास्तीत जास्त प्रत्येकी १० हजार रुपयांची बक्षीसे असणार आहेत. स्पर्धेत भाग घेण्यासाठी नाशिक मनपाच्या संकेतस्थळावर जाऊन क्युआर कोड स्कॅन करून ज्या स्पर्धेत भाग घ्यायचा आहे, त्या स्पर्धेसाठीचा अर्ज भरावा, असे आवाहन आयुक्त तथा प्रशासक मनिषा खत्री यांनी केले आहे.

उत्कृष्ट कचरा वर्गीकरण, शहरातील शाळांसाठी प्लास्टिक कचरा संकलन व जनजागृती, वेस्ट टु बेस्ट, सर्वोत्कृष्ट होम कंपोस्टिंग व कचरा प्रक्रिया स्पर्धा, शालेय विद्यार्थ्यांसाठी चित्रकला व निबंध, स्वच्छता रिल्स, उत्कृष्ट घंटागाडी कर्मचारी, उत्कृष्ट महिला सफाई कर्मचारी, उत्कृष्ट कचरा वेचक महिला अशा स्पर्धा होणार आहे.

'आरटीओ'तील नोकरीच्या आमिषाने २४ लाखांना फसवणूक

लोकसत्ता विशेष प्रतिनिधी

नाशिक : प्रादेशिक परिवहन विभागात उपनिरीक्षक (सब इन्स्पेक्टर) पदावर नोकरी लावून देण्याच्या नावाखाली संशयितांनी एका बेरोजगारास २४ लाख २० हजार रुपयांना फसविल्याचे उघड झाले आहे. पैसे दिले असताना पाच वर्षे उलटूनही नोकरी मिळाली नाही. बेरोजगार युवकाने पाठपुरावा केला असता संशयितांनी बनावट मेलवरून खोटे नियुक्तीपत्र पाठवून दिशाभूल केली.

याबाबत पुंजाबा सोनवणे (समुद्रनगर, सातपूर) यांनी तक्रार दिली. कैलास ठाकूर, छगन अग्रवाल, पवन भूतडा आणि उज्वला वठारक अशी गुन्हा दाखल करण्यात आलेल्या संशयितांची नावे असल्याचे पोलीस सूत्रांनी सांगितले. सोनवणे यांची २०२० मध्ये संशयितांशी भेट झाली होती. यावेळी त्यांनी सोनवणे यांचा विश्वास संपादन करून त्यांचा बेरोजगार मुलगा वैभवला आरटीओत उपनिरीक्षक पदावर नोकरी लावून देण्याचे आमिष दाखवले. त्यासाठी पैसे मागण्यात आल्याने सोनवणे यांनी रोख आणि ऑनलाइन पद्धतीने तब्बल २४ लाख २० हजाराची रक्कम संशयितांना दिली. परंतु, पाच वर्षे उलटूनही नोकरी लागली नाही. त्यामुळे सोनवणे बाप-लेकाने पैसे परत मिळावेत म्हणून तगादा सुरू केला. तेव्हा संशयितांनी नामी शक्कल लढवत वैभव सोनवणे याच्या नावाने आरटीओ कार्यालयात उपनिरीक्षक (सब इन्स्पेकर) या पदावर निवड झाल्याबाबत बनावट ई-मेल पाठवला. या नियुक्ती पत्राच्या आधारे सोनवणे बाप-लेकाने चौकशी केली असता ते बनावट असल्याचे उघड झाले. त्यामुळे बाप-लेकाने पोलिसात धाव घेतली. अंबड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

मनमाडमध्ये वीज खांबावर आगीचा भडका

लोकसत्ता वार्ताहर



मनमाड : शहरातील रेल्वे स्थानक रस्त्यावरील तुफान चौकात पंकज परिधान दुकानाजवळ महावितरणच्या खांबावर अकस्मात आग लागल्याने नागरिकांची तारांबळ उडाली. अग्निशमन दलाच्या मदतीने ही आग तत्काळ आटोक्यात आणल्याने मोठा अनर्थ टळला.

मंगळवारी सायंकाळी तुफान चौकाजवळ असलेल्या महावितरणच्या खांबावर अचानक भडका उडून आग लागली. हा प्रकार लक्षात येताच नागरिकांनी समयसूचकता दाखवली. नगर पालिकेच्या अग्निशमन दलाला तत्काळ पाचारण करण्यात आले. पाण्याचे फवारे मारून ही आग तातडीने आटोक्यात आणली गेली.

'फामपेडा' अध्यक्षपदी अमित गुप्ता, उपाध्यक्षपदी भूषण भोसले

लोकसत्ता वार्ताहर

मालेगाव : महाराष्ट्रातील पेट्रोल पंप व्यावसायिकांची संघटना असलेल्या फेडरेशन ऑफ ऑल महाराष्ट्र पेट्रोल डीलर्स असोसिएशनच्या (फामपेडा) अध्यक्षपदी नागपूर येथील अमित गुप्ता, उपाध्यक्षपदी मालेगावच्या भूषण भोसले यांची सर्वांनुमते निवड करण्यात आली आहे.

'फामपेडा' कार्यकारी मंडळाचा कार्यकाल समाप्त होणार असल्याने नव्या कार्यकारिणीची निवड करण्यासाठी शिर्डी येथे वार्षिक सर्वसाधारण सभा घेण्यात आली. या सभेत सरचिटणीस व समन्वयक म्हणून नाशिकचे अनुक्रमे सुदर्शन पाटील व विजय ठाकरे यांचीदेखील एकमताने निवड करण्यात आली.

'फामपेडा' ही राज्यातील पाच हजार पेट्रोल पंप व्यावसायिकांची संघटना आहे. तसेच राज्यातील प्रत्येक जिल्ह्याच्या ठिकाणी असणारी पेट्रोल पंप वितरकांची संघटना सदर संघटनेच्या संलग्नपणे काम करते.

समांतर एसटी वर्कर्स काँग्रेस संघटना स्थापनेमुळे चर्चा

नाशिक : महाराष्ट्र एसटी वर्कर्स काँग्रेस (इंटक) संघटनेत अनेक गट-तट पडल्यानंतर या संघटनेचे कधीकाळी नेतृत्व करणारे काँग्रेसचे दिवंगत नेते जयप्रकाश छाजेड यांच्या नावाने आता नव्या एसटी वर्कर्स काँग्रेस संघटनेची स्थापना करण्यात आली आहे. मूळ इंटक संघटनेचे राज्याध्यक्षपद आकाश छाजेड यांच्याकडे आहे. नव्या संघटनेचे अध्यक्षपद प्रीतीश छाजेड यांच्याकडे देण्यात आले असून समांतर संघटना स्थापण्यामागील कारणांची चर्चा होत आहे.

बुधवारी लोकनेते जयप्रकाश छाजेड एसटी वर्कर्स काँग्रेस संघटनेची पहिली राज्यस्तरीय बैठक येथे पार पडली. यावेळी नव्या संघटनेचे अध्यक्ष प्रीतीश छाजेड यांनी १० वर्षांपासून एसटी कर्मचाऱ्यांच्या वेतन वाढीवा करार झाला नसल्याकडे लक्ष वेधले. शासनाकडून एसटी कर्मचाऱ्यांच्या प्रश्नांबाबत टाळाटाळ होत आहे.

वेतनवाढ, महागाई भत्ता, कर्मचाऱ्यांच्या अडचणींचे निराकरण करण्याची मागणी त्यांनी केली. संघटनेचे सरचिटणीस आर. डी. गवळी यांनी कर्मचाऱ्यांच्या प्रश्नांकडे शासनाने दुर्लक्ष केल्यास आंदोलनाची दिशा ठरवली जाईल, असे प्रास्ताविकात सांगितले. महाराष्ट्र एसटी वर्कर्स काँग्रेसचे अध्यक्ष आकाश छाजेड यांनी नवीन संघटना महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात पोहोचविण्यासाठी सर्वांनी एक दिलाने काम करण्याचे आवाहन केले.

स्वतःच्या स्वार्थासाठी ज्या, ज्या संघटना काम करीत आहेत आणि ज्यांच्यामुळे संप काळात कर्मचाऱ्यांचे अतोनात नुकसान झाले, अशा स्वघोषित नेत्यांना आता एसटी कर्मचाऱ्यांनी दूर ठेवावे, असे सांगितले. दिवंगत जयप्रकाश छाजेड यांच्या नावाची संघटना लवकरच महाराष्ट्रात पहिल्या क्रमांकाची संघटना होईल, असे मत राज्य एसटी कर्मचाऱ्यांचे नेते पाटील यांनी व्यक्त केले.

Issued in public interest
Cervical Cancer Prevention Foundation
U88900MH2024NPL420537
&
RadhaLaxmi Multipurpose Foundation

भारतामध्ये दर ७ मिनिटांनी गर्भाशयाच्या मुखाच्या (सर्व्हायकल कॅन्सर) कर्करोगामुळे एक मृत्यू होतो.

कर्करोग कधी कोणाला होईल हे सांगता येत नाही...
कृपया स्वत:ची आणि आपल्या प्रियजनांची काळजी घ्या.
लसीकरणाची योजना व दर २ वर्षांनी पॅप टेस्ट करून घ्या.

आपल्या डॉक्टरांशी संपर्क साधा किंवा WWW.CCPF.IN ला भेट द्या
आणि जवळच्या CCPF सेंटरसाठी **Send WhatsApp "hi" 7775800027**
Call : 99224 00310

Amol advt

ADITYA BIRLA CAPITAL — PROTECTING INVESTING FINANCING ADVISING

आदित्य बिर्ला हाऊसिंग फायनान्स लिमिटेड

नोंदणीकृत कार्यालय : इंडियन रेयॉन कम्पाऊण्ड, वेरावल, गुजरात-३६२ २६६
शाखा कार्यालय : जी कॉर्प टेक पार्क, ८वा मजला, कासारवडवली, घोडबंदर रोड, ठाणे-४०० ६०१ (महाराष्ट्र)

मागणी सूचना (सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेन्ट) रुल्स, २००२च्या रुल ३(१) अंतर्गत)

सिक्युरिटायजेशन अँण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल अँसेट्स अँण्ड एन्फोर्समेन्ट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट अँक्ट, २००२च्या सेक्शन १३(२) अंतर्गत सूचनेची पर्यायी सेवा

याखाली नमूद केलेल्या ऋणकोंकरिता याद्वारा सूचना देण्यात येते की, त्यांनी **आदित्य बिर्ला हाऊसिंग फायनान्स लिमिटेड**कडून (**''एबीएचएफएल''**) त्यांच्याद्वारा लाभ घेण्यात आलेल्या पत सुविधेच्या परतफेडीत कसूर दाखविली आहे, त्यामुळे त्यांच्या कर्ज खात्यांचे त्याकरिता भारतीय रिझर्व्ह बँकेच्या मार्गदर्शक सूत्रांनुसार कंपनीच्या बुक्समध्ये **नॉन-परफॉर्मिंग अँसेट्स** म्हणून वर्गीकरण करण्यात आले आहे. त्यानंतर **'एबीएचएफएल'**ने उक्त ऋणकोंवर फर्मांविणारी त्यायोगे त्यांच्या शेवटच्या ज्ञात पत्त्यांवर सिक्युरिटायजेशन अँण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल अँसेट्स अँण्ड एन्फोर्समेन्ट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट अँक्ट, २००२च्या सेक्शन १३(२) (सरफेसी कायदा)अंतर्गत **मागणी सूचना** निर्गमित केल्या आहेत आणि उक्त मागणी सूचनांमध्ये नमूद केल्यानुसार पूर्वोक्त रक्कम व आनुषंगिक खर्च, किंमत, आकार इ.सह संविदात्मक दरातील पुढील व्याजासह एकत्रित संपूर्ण **थकीत रकमे**ची परतफेड करण्याकरिता त्यांच्याकडून मागणी केलेली आहे. तथापि, मागणी सूचना सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेन्ट) रुल २००२ (सरफेसी रुल्स)च्या रुल ३ नुसार या प्रसिद्धीद्वारासुद्धा देण्यात येत आहे.

अ. क्र.	ऋणको/ सह-ऋणको व हमीदार/ सह-हमीदाराचे नाव व पत्ता/ कर्ज खाते क्र.	एनपीए तारीख	मागणी सूचनेची तारीख	मागणी सूचनेनुसार/ तारखेनुसार देय रक्कम
१	**१. निलेश रमेश पिंगळे-** टेनेमेन्ट नं. एन-५३/ए, जे-१/३०/०८, तळमजला + पहिला मजला, एनएच. आषाढ, ५वी स्कीम, भोले मंगल कार्यालयासमोर, उत्तम नगर, अँट सिडको, ता. व जि. नाशिक, नाशिक-४२२ ००९, महाराष्ट्र. **२. रेखा रमेश पिंगळे-** टेनेमेन्ट नं. एन-५३/ए, जे-१/३०/०८, तळमजला + पहिला मजला, एनएच. आषाढ, ५वी स्कीम, भोले मंगल कार्यालयासमोर, उत्तम नगर, अँट सिडको, ता. व जि. नाशिक, नाशिक-४२२ ००९, महाराष्ट्र. **३. निलेश रमेश पिंगळे-** राजरत्न नगर, सिडको, एन-५३/ए, जे-१/३०/०७, राम मंदिराजवळ, नाशिक-४२२ ००९, महाराष्ट्र. **४. रेखा रमेश पिंगळे-** राजरत्न नगर, सिडको, एन-५३/ए, जे-१/३०/०७, राम मंदिराजवळ, नाशिक-४२२ ००९, महाराष्ट्र. **५. निलेश रमेश पिंगळे-** द्वारा- राजेश्वरी सिजनेरी जनरल स्टोअर्स अँण्ड व्हेजिटेबल फूड शॉप नं. ४३, श्री छत्रपती शिवाजी महाराज भाजी मार्केट, सातपूर, नाशिक-४२२ ००७, महाराष्ट्र. **६. निलेश रमेश पिंगळे-** ५३, एजे/१५/३, उत्तम नगर, राम मंदिराजवळ, सिडको, नाशिक, सिडको कॉलनी, नाशिक-४२२ ००९, महाराष्ट्र. **७. रेखा रमेश पिंगळे-** ५३, एजे/१५/३, उत्तम नगर, राम मंदिराजवळ, सिडको, नाशिक, सिडको कॉलनी, नाशिक-४२२ ००९, महाराष्ट्र. **लोन अका. नं. : एलएनएनएस०एचएल-०८२१००९७३४८ आणि एलएनएनएस०एचएल-०८२१००९७३४९**	०३.०३.२०२५	०६.०३.२०२५	**रु. १७,०७,६९९/-** (रु.सतरा लाख सात हजार सहाशे नव्याण्णव फक्त) थकीत मुद्दल, थकीत रक्कम द्वारा (निघालेला विलंब आकार समाविष्ट) आणि **०५.०३.२०२५** पर्यंत व्याज

स्थावर मालमत्तेचे वर्णन (गहाण असलेली मालमत्ता) : पुढील मालमत्तेचे सर्व खंड व तुकडे : टेनेमेन्ट नं. एन-५३/ए, जे-१/३०/०८, तळमजला + पहिला मजला, मोजमापाचा प्लॉट एरिया ४०.०० चौ.मी. म्हणजेच ४३१ चौ.फू., कार्पेट एरिया ३८.०५ चौ.मी. म्हणजेच ४०९ चौ.फू. एनएच. आषाढ, ५वी स्कीम, भोले मंगल कार्यालयासमोर, उत्तम नगर, अँट सिडको, ता. व जि. नाशिक, नाशिक-४२२ ००९, महाराष्ट्र आणि **पुढीलप्रमाणे सीमित : पूर्व :** कॉलनी रोड, **पश्चिम :** ड्रेनेज लाइन व अन्य हाऊस, **उत्तर :** टेनेमेन्ट नं. एन-५३/ए जे-१/३०/०७, **दक्षिण :** कॉलनी रोड.

आम्ही याद्वारा वामध्ये नमूद केलेल्या ऋणकोंना फर्मावीत आहोत की, त्याकरिता किंमत, आकार, खर्च इ. अधिक त्यावरील पुढील व्याजासह एकत्रित थकीत रक्कम या सूचनेच्या तारखेपासून ६० दिवसांच्या आत आम्हास प्रदान करावी, त्यास असमर्थ ठरल्यास आम्हास अंतर्भूत सुरक्षा हित लागू करण्यास; परंतु ताबा घेण्यास मर्यादित नसलेले व किंमत व परिणाम यानुसार तुमच्या जोखमीवर संपूर्णतः सुरक्षित मत्तेची विक्री करण्यास स्वातंत्र्य असेल.

कृपया नोंद घ्यावी की, सरफेसी ॲक्टच्या सेक्शन १३(१३) नुसार, तुम्हा सर्वांना कंपनीच्या पूर्वलेखी परवानगीशिवाय पूर्वोक्त सुरक्षित मत्तेची विक्री, भाडेपट्टा किंवा अन्यखेरीज हस्तांतरणापासून प्रतिबंधित करण्यात आले आहे. तुमच्याकडून उक्त कलमांचे कोणत्याही प्रकारे उल्लंघन झाल्यास तुम्हास सरफेसी ॲक्टच्या सेक्शन २९ अंतर्गत आणि/किंवा यासंबंधित कोणत्याही अन्य विधि तरतुदींनुसार दंडात्मक कारवाईस तोंड द्यावे लागेल.

कृपया नोंद घ्यावी की, ॲक्टच्या सेक्शन १३च्या सब-सेक्शन (८) नुसार, जर 'एबीएचएफएल'द्वारा निघालेली सर्व किंमत, आकार व खर्चासह एकत्रित 'एबीएचएफएल'च्या देणींचे विक्री किंवा हस्तांतरणाकरिता निश्चित केलेल्या तारखेपूर्वी कोणत्याही वेळेत प्रदान केल्यास 'एबीएचएफएल'द्वारा सुरक्षित मत्तेची विक्री केली जाणार नाही किंवा हस्तांतरण केले जाणार नाही. आणि 'एबीएचएफएल'द्वारा सुरक्षित मत्तेचे हस्तांतरण किंवा विक्रीकरिता कोणतेही पुढील पाऊल उचलले जाणार नाही.

दिनांक : १३.०३.२०२५
स्थळ : नाशिक

स्वाक्षरी/- प्राधिकृत अधिकारी
(आदित्य बिर्ला हाऊसिंग फायनान्स लिमिटेड)

डीसीबी बँक लि.

रिटेल ॲसेट कलेक्शन डिपार्टमेन्ट : ३०२, सेल्लो प्लॅटिना, एफ. सी. रोड, शिवाजी नगर, पुणे-४११ ००५

DCB BANK

ई-लिलाव विक्री सूचना

(सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेन्ट) रुल्स २००२च्या रुल ९(१) अंतर्गत)

सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेन्ट) रुल्स, २००२च्या रुल ९(१) यासह वाचलेल्या रुल ८(६)च्या तरतुदींसह वाचलेल्या सिक्युरिटायझेशन ॲण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल ॲसेट्स ॲण्ड एन्फोर्समेन्ट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२ अंतर्गत स्थावर मत्तेच्या विक्रीकरिता ई-लिलाव विक्री सूचना.

याद्वारा आम जनतेस आणि विशेषकरून ऋणको, सह-ऋणको व हमीदारांना प्राधिकृत अधिकारींद्वारा सूचना देण्यात येते की, खाली नमूद केलेली मालमत्ता डीसीबी बँक लिमिटेडकडे गहाण ठेवलेली आहे. बँकेच्या प्राधिकृत अधिकारींनी सिक्युरिटायझेशन ॲण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल ॲसेट्स ॲण्ड एन्फोर्समेन्ट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२च्या तरतुदीअंतर्गत मालमत्तेचा ताबा घेतला आहे. ऋणकोंचे लक्ष सरफेसी ॲक्टच्या सेक्शन १३च्या सब-सेक्शन ८च्या तरतुदींकडे वेधीत आहोत, विमोचनाचा हक्क उक्त ॲक्टमध्ये विहित केल्यानुसार कोणत्याही प्रणालीचा वापर करून विक्रीकरिता निश्चित केलेल्या तारखेस थांबविण्यात येणार आहे. मालमत्तेची विक्री खालील नमूद केलेल्या तपशिलानुसार देणी आणि पुढील व्याज, आकार व किंमत इ. देणींच्या वसुलीकरिता निविदा-नि-जाहीर ई-लिलावाद्वारा करण्यात येणार आहे. मालमत्तेची विक्री याखाली अनुसूचीमध्ये दिलेल्या व नमूद केलेल्या संक्षिप्त तपशिलानुसार डीसीबी बँक लिमिटेडला ज्ञात असलेल्या किंवा ज्ञात नसलेल्या सर्व विद्यमान व भावी भारांसह, जर असल्यास, ''जसे आहे जेथे आहे'' व ''जसे आहे जे काही आहे'' आणि ''जे काही आहे तेथे आहे'' या तत्त्वावर करण्यात येणार आहे.

अ. क्र.	ऋणको, सह-ऋणको व हमीदाराचे नाव	एकूण थकीत देणी (रु.) १२.०३.२०२५ रोजीप्रमाणे	राखीव किंमत (रु.)	इरठे (रु.)	ई-लिलावाची तारीख व वेळ	ताब्याचा प्रकार
१.	वर्षा अनिल खैरनार एचएचओएमएनएएस०००४४८१३	रु. ८,२३,५७२/-	रु. ४,५०,०००/-	रु. ४५,०००/-	२८.०३.२०२५ रोजी दु. ०३.०० ते दु. ०४.००	प्रत्यक्ष

मालमत्तेचा पत्ता : ''पुढील मालमत्तेचे सर्व खंड व तुकडे : फ्लॅट नं. ०७, दुसऱ्या मजल्यावरील, मोजमापाचा बिल्ट-अप एरिया ३४.३८ चौ.मी. म्हणजेच ३७०.०० चौ.फू., 'साई स्पर्श' म्हणून ज्ञात असलेल्या आरसीसी बांधकाम केलेल्या बिल्डिंगमधील प्लॉट नं. २१ वरील एरिया १९७.५० चौ.मी., सर्व्हे नं. ५५/१/१/२, येथे स्थित-जाउल्के दिंडोरी ग्रामपंचायत, ता. दिंडोरी, जिल्हा नाशिकच्या मर्यादित आणि पुढीलप्रमाणे सीमित : पूर्वेला किंवा त्या दिशेने : फ्लॅट नं. ६, पश्चिमेला किंवा त्या दिशेने : मार्जिन स्पेस व फ्लॅट नं. २२, दक्षिणेला किंवा त्या दिशेने : प्लॉट नं. ७ व ओपन स्पेस, उत्तरेला किंवा त्या दिशेने : स्टेअरकेस व फ्लॅट नं. ८. (सुरक्षित मत्ता)''

इरठेच्या सादरीकरणाची तारीख व वेळ : २८.०३.२०२५, दु. १२.०० वा.पर्यंत किंवा तत्पूर्वी सहभागाचे विनंती पत्र, केवायसी, पॅन कार्ड, इरठेचा पुरावा यांसह ई-मेल आयडी- kuldeep.salokhe@dcbbank.com / vaibhav.chandanshive@dcbbank.com / kalpesh.verma@dcbbank.com यावरून.

स्वारस्य असलेले खरेदीदार/ बोलीदारांनी डीसीबी बँक लिमिटेडच्या नावे डिमाण्ड ड्राफ्ट/ पे-ऑर्डरद्वारा इरठे रक्कम भरणे आवश्यक आहे.

पाहणीची तारीख व वेळ : १३.०३.२०२५ ते २७.०३.२०२५ रोजी स. ११.०० व दु. ०४.०० दरम्यान.

ठिकाण नाशिककरिता संपर्क व्यक्तीचे नाव : श्री. शैलेश कुलकर्णी- ९७६५५५५६९९/ श्री. कुलदीप सलोखे, मोबा. नं.- ९८९०७४१०११.

ई-लिलावाच्या शर्ती व अटी :

(१) लिलाव विक्री ५ मिनिटांच्या अमर्यादित विस्तारासह खाली तालिकेत नमूद केल्यानुसार तारखांदिवशी https://sarfaesi.auctiontiger.net या वेबसाइटद्वारा ''ऑनलाइन ई-लिलाव'' बोली प्रक्रियेद्वारा करण्यात येणार आहे. बोलीदारांना सल्ला देण्यात येतो की, त्यांनी ई-लिलाव विक्री प्रक्रियेमध्ये भाग घेतेवेळी व त्यांच्या बोली सादरीकरणापूर्वी लिलाव विक्रीच्या सविस्तर शर्ती व अटींकरिता https://sarfaesi.auctiontiger.net या वेबसाइटला भेट द्यावी.

(२) स्वारस्य असलेल्या बोलीदारांनी पोर्टलवर स्वतःची नोंदणी करून घेणे आवश्यक आहे आणि आधीच लिलाव सेवा-पुरवठाकार (मेसर्स ई-प्रोक्युअरमेन्ट टेक्नोलॉजीस लि. (ऑक्शन टायगर) अहमदाबाद (टेलि. : ०७९-६८१३ ६८३७/८०/९०, (मोबा.) ९२६५५६२८२१/ ९२६५५६२८१८) संपर्क व्यक्ती : श्री. चिंतन भट्ट, मोबा. नं.- ९९७८५९११८८, ई-मेल : chintan.bhatt@auctiontiger.net, support@auctiontiger.net यांच्याकडून लॉगइन आयडी व पासवर्ड प्राप्त करावा. जो ई-बोली प्रक्रियेकरिता अनिवार्य आहे. कृपया नोंद घ्यावी की, भावी बोलीदार केवळ त्यांच्या नोंदणीकृत मोबाइल नंबरवरून ई-लिलावावरील ऑनलाइन प्रशिक्षणाचा लाभ घेऊ शकतील.

(३) ऑनलाइन ई-लिलाव सहभाग विहित प्रपत्रात अर्ज करून लिलाव प्रक्रियेत अनिवार्य आहे, जो वेबसाइटवर प्रस्ताव/ निविदा कागदपत्रांसह उपलब्ध आहे.

(४) बोलीदारांना सल्ला देण्यात येतो की, त्यांनी https://www.dcbbank.com/cms/showpage/page/customer-corner या लिंकद्वारा त्यांच्या बोली सादर करण्यापूर्वी लिलाव विक्रीच्या सविस्तर शर्ती व अटी वाचाव्यात आणि अधिक तपशिलाकरिता यांच्याशी थेट संपर्क साधता येईल : श्री. कुलदीप सलोखे- ९८९०७४१०११/ श्री. शैलेश कुलकर्णी- ९७६५५५५६९९/ श्री. वैभव चंदनशिवे- ०२०६७२५३००१ व ८०१०६८७६५७/ श्री. कल्पेश वर्मा- ८६६८३८२०५१ डीसीबी बँक लिमिटेडचे प्राधिकृत अधिकारी.

दिनांक : १३.०३.२०२५
ठिकाण : नाशिक

''सदर नोटिसीमध्ये नमूद केलेल्या सर्व मजकुराबाबतच्या अधिक सुस्पष्टतेसाठी इंग्रजी भाषेतील प्रसिद्ध झालेली नोटीस ग्राह्य धरण्यात येईल.''

स्वाक्षरी/- प्राधिकृत अधिकारी,
डीसीबी बँक लिमिटेड

pnb Housing Finance Limited — Ghar Ki Baat

परिशिष्ट-IV-ए
स्थावर मालमत्तेची ई-लिलाव विक्री सूचना
सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेन्ट) रुल्स, २००२च्या रुल ८(६)च्या तरतुदींसह वाचलेला सिक्युरिटायझेशन ॲण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल ॲसेट्स ॲण्ड एन्फोर्समेन्ट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२ अंतर्गत स्थावर मत्तेच्या विक्रीकरिता ई-लिलाव-विक्री सूचना

नोंदणीकृत कार्यालय : ९वा मजला, ऑतिक्षि भवन, २२ कस्तुरबा गांधी मार्ग, नवी दिल्ली-११० ००१. फोन्स : ०११-२३३५७१७१, २३३५७१७२, २३७०५४१४, वेबसाइट : **www.pnbhousing.com.**
नाशिक शाखा : ऑफिस नं. ४०७ व ४०८, ४था मजला, पद्म विश्व लँण्डमार्क, तलिक शोरूमजवळ, ॲक्सिस बँकेच्या वरती, राका कॉलनी, शरणपूर रोड, नाशिक-४२२ ००२.

याद्वारा आम जनतेस आणि विशेषकरून रकाना नं. 'ए'मध्ये दर्शविलेल्या ऋणको व हमीदारांना सूचना देण्यात येते की, सुरक्षित धनकोकडे गहाण असलेल्या/ ताब्यात असलेल्या याखालील रकाना नं. 'डी'मध्ये वर्णिलेल्या स्थावर मालमत्तेचा विधायक/ प्रत्यक्ष ताबा (रकाना नं. 'सी'मध्ये वर्णिलेल्यानुसार) मेसर्स पीएनबी हाऊसिंग फायनान्स लिमिटेड/ सुरक्षित धनकोच्या प्राधिकृत अधिकारींद्वारा घेण्यात आला आहे. सदर स्थावर मालमत्तेची विक्री याखाली दिलेल्या तपशिलानुसार **''जसे आहे जेथे आहे''**, **''जसे आहे जे काही आहे''** आणि **''जे काही आहे तेथे आहे''** या तत्त्वावर करण्यात येणार आहे. ऋणको/ गहाणकार/ विधि वारसदार, विधि प्रतिनिधी (जे ज्ञात आहेत किंवा ज्ञात नाहीत), तारखेनुसार सुधारित कल्याणप्रमाणे सिक्युरिटी इंटरेस्ट एन्फोर्समेंट रुल्स, २००२च्या रुल ८(६) व ९ अंतर्गत रकाना नं. 'ए'मध्ये दर्शविल्यानुसार, जसे असेल त्यानुसार, संबंधित ऋणको/ गहाणकारांचे (दिवंगत असल्यामुळे) विषादक, प्रशासक, उत्तराधिकारी, अभिहस्तांकिती यांना याद्वारा सूचना देण्यात आली आहे.

विक्रीच्या सविस्तर शर्ती व अटींकरिता कृपया मेसर्स पीएनबी हाऊसिंग फायनान्स लिमिटेड/ सुरक्षित धनकोच्या **www.pnbhousing.com** या वेबसाइटवर तरतूद केलेली लिंक पाहावी.

लोन नं./ ऋणको/ सह-ऋणको/ हमीदार/ विधि वारसदाराचे नाव (ए)	मागणी केलेली रक्कम व तारीख (बी)	ताब्याचे स्वरूप (सी)	गहाण असलेल्या मालमत्तेचे वर्णन (डी)	राखीव किंमत (आरपी) (ई)	इरठे (आरपीची १०%) (एफ)	बोलीच्या सादरीकरणाची शेवटची तारीख (जी)	बोलीवृद्धी दर (एच)	पाहणीची तारीख व वेळ (आय)	लिलावाची तारीख व वेळ (जे)	ज्ञात भार/ न्यायालयीन प्रकरणे, जर असल्यास (के)
एचओयू/एनएसके/१११६/३३१२३० आणि एचओयू/एनएसके/ १११६/३३२१४५, शा.का. : नाशिक, सुनील प्रमोद भावसार/ पल्लवी कमलाकर जोगी	रु. १९८००८६.६५/- ३१.०३.२०२१ रोजीप्रमाणे	प्रत्यक्ष ताबा	रेसिडेन्शियल सिंगल बिल्डिंग, ७.७०३, गजानन दर्शन, प्लॉट नं. १५, सर्व्हे नं. ३२३/१/१बी, अतुल स्वीट्सजवळ, पाथर्डी फाटा, पाथर्डी, नाशिक-४२२ ००१, महाराष्ट्र, भारत. (बिल्ट-अप एरिया ६५९)	रु. १४२२०००/-	रु. १४२२००/-	२७.०३.२०२५